स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड - ४३१६०६, महाराष्ट्र राज्य,भारत

नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच. डी) पदवी करिता सादर करावयाचा
संशोधन आराखडा

संशोधक,
सविता प्रकाश लव्हाळे,

मार्गदर्शक,
प्रा. डॉ. सुरेश व्ही. धनवडे,
प्रोफेसर व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग,
एस. एम. बी. पी. के. महाविद्यालय शंकरनगर,
ता. बिलोली जि. नांदेड

समाजशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

2023

1.प्रस्तावना

मानवी समाज जीवनाच्या काळापासूनच उत्पादन कार्य असो, शेती काम असो, बालसंगोपन असो की नोकरी विषयक काम असो प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत कार्य चालू आहे. आज महिला ह्या वेगवेगळ्या क्षेत्रात वावरताना दिसून येत आहेत. परिचारिका व्यवसाय करणाऱ्या महिला मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. परिचारिका हा व्यवसाय जरी आधुनिक काळात निर्माण झाला असला तरी त्याची पाळीमुळे ही प्राचीन काळापासून आहेत. त्यामुळे प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत परिचारिका व्यवसाय दिसून येतो.

परिचारिका म्हणजे रुग्णांचे रक्षण करणारी, जेवण देणे, औषधी देणे, त्यांची काळजी घेणारी स्त्री म्हणजेच परिचारिका होय. परिचारिका (NURSE) हा शब्द आहे. तो शब्द (NURTURE) व (NURTRICIOUS) या शब्दापासून आलेला आहे. (NURTRICIOUS) म्हणजे पालन पोषण करणे, त्याचे रक्षण करणे होय. आरोग्यास हितकारक असे शिक्षण देणारी शिक्षिका म्हणजे परिचारिका होय.

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत मानवीसेवा हा एक व्यवसाय निर्माण झाला आहे. त्याची गरज निर्माण झाली कारण या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत कुटुंब संस्थेचे विघटन झाले आहे. मानवाला आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. त्यामुळे मानवाचे जीवन गतिशील झाले आहे. अपघात, आजार आणि वृद्धत्वाची काळजी घेण्यासाठी घरात व्यक्तींना वेळ नाही, चांगली सेवा देण्याचे ज्ञान नाही. त्यामुळे परिचारिकांची गरज निर्माण झाली आहे. परिचारिका आपल्या भूमिका पार पाडत असताना कौटुंबिक आणि सामाजिक

जीवनात अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते त्यामुळे त्यांच्या जीवनात विभिन्न प्रश्न निर्माण झाले आहेत.

भारतात पहिले नर्सिंग ट्रेनिंग सेंटर 1867 दिल्ली स्तवन हॉस्पिटल येथे करण्यात आले. 1871 मध्ये पहिली नर्सिंग स्कूल स्थापन करण्यात आली तेथे चार विद्यार्थिनी होते. 1946 मध्ये बी.एस.सी. नर्सिंग आर.ए.के. कॉलेज दिल्ली येथे स्थापना झाली. एम.एस. सी. नर्सिंग ची सुरुवात 1960 मध्ये वेल्लोर येथे झाली. A.N.M. नर्सिंग ची सुरुवात 1951 मध्ये मेरी हॉस्पिटल पंजाब येथे झाली. जी.एन.एम. नर्सिंगची सुरुवात देखील मेरी हॉस्पिटल पंजाब येथे झाली. महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या प्रेरणेने सन 1952 मध्ये एस.एन.डी.टी. विद्यापीठाअंतर्गत लिलाबाई ठाकूर यांनी कॉलेज ऑफ नर्सिंगची स्थापना केली. अशा प्रकारे परिचारिकाची सुरुवात झाली. प्रत्येक शहरात परिचारिकांचा प्रसार झाला. नांदेड शहरात देखील परिचारिकांचा प्रसार झाला.

नांदेड जिल्हा हा भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्र राज्याच्या मध्यपूर्व भागात अरबी सागर व बंगालच्या खाडी पासून दूर व भारत भूखंडाच्या मध्यांतर्गत भागात वसलेला आहे. नांदेड शहर हे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले आहे. नांदेड या नावाचा उगम नंदी तट या शब्दापासून झालेला आहे. नंदी म्हणजे भगवान श्री शंकराचे वाहन आणि तट म्हणजे पवित्र गोदावरी नदीचा असलेला काठ, गोदावरी नदीच्या काठावर तपस्या केलेली अख्यायिकात आहे असे म्हणण्यात आले. तसेच गोदावरी नदीच्या काठी असल्यामुळे नांदेड, नदीकट, नंदीगड आणि नांदीतट या संस्कृत शब्दापासून नांदेडची उत्पत्ती झाली आहे. प्राचीन काळापासून परिचारिका

या आजच्या आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या शहरात परिचारिकांचा व्यवसाय करताना आढळून येतात त्याचप्रमाणे नांदेड शहरात मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळून येते. तसेच परिचारिकाही चांगले काम करीत असून देखील त्यांना समाजात उपेक्षित वर्गात मानले जाते. त्यांना येणाऱ्या मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीमुळे हे क्षेत्र निवडावे लागते. त्यांना शिक्षणाची आवड असून देखील शिकता येत नाही. तसेच त्यांचे कार्य पुढे यावे, त्यांच्या समस्या पुढे याव्यात, त्यांना समाजात स्थान मिळावे, एक आरोग्याचे चांगले शिक्षण देणारी शिक्षिका म्हणून तिच्याकडे पाहण्यात यावे, तिच्या मनातील जो न्यूनगंड आहे तो निघावा म्हणून नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन हा अभ्यास करण्यासाठी आवडीने निवडण्यात येणार आहे.

1.1 फ्लॉरेन्स नाइटिंगेल चे युग :

फ्लॉरेन्स यांना जगभर ओळखले जाते ते अतुलनीय परिचर्येच्या कामगिरी मुळेच लॉरेन्स नायटिंगलचे आई-वडील विल्यम एडवर्ड नाइटिंगेल आणि फ्रान्सिस स्मिथ यांची पहिली कन्या तिचे पार्थिनोपे तर द्वितीय कन्या फ्लॉरेन्स नाइटिंगेल तिचा जीवनपट बारा 12 मे 1820 रोजी इटलीतील फ्लोरेन्स विला कोलंबिया या ठिकाणी फ्लॉरेन्स नाइटिंगेलचा जन्म झाला जन्म गावावरूनच नाव ठेवण्यात आले थिओडोर फ्लिडणेर या धर्मगुरुने एक अनाथाश्रम एक विद्यालय आणि एक रुग्णालय कैसर वर्थ जर्मनी येथे स्थापन केले होते येथे फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांनी सर्वप्रथम रुग्णसेवेचे वृत्त अनुभवले नाइटिंगेल 20 वर्षाची असताना आई-वडिलाकडे

गणिताचा अभ्यास करण्याचा हट्ट धरला काही काळ आई-वडिलांमध्ये भावनिक संघर्ष झाला नंतर त्यांची परवानगी मिळवली.

सर्वप्रथम घराबाहेर जाऊन रुग्णसेवा करायला हॉस्पिटलमध्ये रुजू झाली फ्लॉरेन्स नाइटिंगेल ने सांस्कृतिक अभ्यासाच्या दृष्टीने इजिप्त आणि ग्रीसला भेट दिली लंडन मधल्या सिक जेंटल वुमेन नावाच्या संस्थेत महिला अध्यक्ष अधीक्षक म्हणून रुजू झाल्या जागतिक युद्धाविषयी सिडेन हार्बर यांनी फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना आपल्या परिचारिका अनुयायी घेऊन युद्धातील जखमी सैनिकांची काळजी घेण्यास, परिचर्या करण्यास बोलाविले. तेथे पोस्टर्स ऑफ चॅरिटीज संस्थेच्या फ्रेंच स्त्रिया अगोदरच काम करू लागल्या होत्या जखमी सैनिकांची व समाजातील आजारी लोकांची परिचर्या करण्यास लागणारे प्रशिक्षण फॉरेन नाइटिंगेल यांनी अगोदरच घेतले होते. समाजातील कुटुंबाची प्रकृती, स्वास्थ्य व आरोग्य संवर्धनासाठी स्त्रियांना काम शिकविणे त्यांना परिपूर्ण प्रशिक्षत करणे हेही शिक्षण त्यांनी अगोदरच घेतले होते. दवाखान्यातील व्यवस्थापन अत्याधुनिक करण्यात फ्लॉरेन्सनाइटिंगेल यांचा मोठा वाटा होता.

क्रिमियन युद्धामध्ये फ्लॉरेन्स नाइटिंगेल या दवाखान्याची प्रमुख होती. युद्धामध्ये प्रमुख समस्या अशी होती की प्रत्यक्षपणे आराखडा तयार करून उत्कृष्ट परिचर्या देणे शक्य नव्हते तरी देखील फ्लॉरेन्सयांनी जास्तीत जास्त अनुभव असणाऱ्या परिचारिकांना युद्धभूमीवर काम करण्यास बोलाविले होते, तिने लष्करी दवाखान्यात स्त्रियांना काम करण्यासारखी परिस्थिती निर्माण केली. युद्धभूमीवर सैनिक तिच्याकडे अतिशय सहानुभूतीपूर्वक पाहत असत तिचे निस्वार्थी काम पाहून

त्यांना बक्षीस देण्यात आले हे बक्षीस जवानांकडूनच वर्गणी करून दिले गेले होते. या रकमेमधून फ्लॉरेन्स नाइटिंगेल ट्रेनिंग स्कूल या नावाची परिचर्या प्रशिक्षण शाळा सेंट थॉमस दवाखान्यात सुरू केली. सर्व देशांमध्ये परिचारिकांच्या महत्त्वाच्या जागा निर्माण केल्या विश्रांती ग्रह बांधली युद्धाच्या काळात केलेल्या कार्यामुळे तिला लेडी विथ लॅम्प असे नमाभिधान मिळाले फॉरेन नाइटिंगेल यांनी शास्त्रोक्त पद्धतीने परीचर्येस सुरुवात केली म्हणून तिला परिचर्याचे जनक असे म्हटले आहे, म्हणून परिचारिका आजही 12 मे हा दिवस फॉरेन नाइटिंगेल चा जन्मदिवस जगभर साजरा करतात विशेषता परिचर्या क्षेत्रात परिचर्या दिन म्हणून साजरा होत आहे त्यांनी मृत सैनिकाचे शरीर विच्छेदन करण्यासाठी परवानगी दिल्यामुळे शरीर शास्त्रात व शरीर विज्ञान याबद्दल परिचर्या व्यवसायात मोठी सुधारणा झाली.

1.2 भारतातील परिचारिकांचा इतिहास -

भारत हा जगातील लोकसंख्येच्या बाबतीत (2011 च्या जनगणनेनुसार) दुसऱ्या क्रमांकाचा देश असल्याने भारतात आरोग्याच्या सुविधांची गरज मोठ्या प्रमाणात आहे. त्या अनुषंगाने विचार केला तर भारतात सध्या आरोग्य क्षेत्रात 2/3 काम करणाऱ्या परिचारिका आहेत, त्यामुळे परिचारिकांचे महत्त्व आरोग्य क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे आहे. रोग्यांना प्रोत्साहन देणे, रोगावर प्रतिबंध करणे इत्यादी कामे परिचारिका करीत आहे. इंडियन नर्सिंग काऊन्सिल या संस्थेचे अध्यक्ष पी.दिलीप कुमार यांनी हेल्दी इंडिया क्रोनिकल या संस्थेची स्थापना केली. 17 व्या शतकात पोर्तुगीजांनी भारतात आधुनिक नर्सिंग चा पाया घातला. सन 1664 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने सैनिकासाठी मद्रास येथे स्थापन केलेल्या फोर्ट

सेंट जॉर्ज हॉस्पिटल मध्ये परिचारिकांची प्रथम सुरुवात केली. 1797 मध्ये गरीब मातांसाठी हे हॉस्पिटल सुरू केले. 1708 मध्ये पहिले हॉस्पिटल कलकत्ता येथे (फोर्ट विल्यम हॉस्पिटल) ची सुरुवात झाली. 1838 मध्ये कलकत्ता मेडिकल कॉलेज हॉस्पिटल ची सुरुवात झाली. 1843 मध्ये मुंबई मध्ये आग्रा येथे थॉमसन हॉस्पिटल सुरू करण्यात आले. 1855 मध्ये होली फॅमिली हे हॉस्पिटल दिल्ली येथे सुरू करण्यात आले. 1860 मध्ये सिविल हॉस्पिटल अमृतसर, 1881 मध्ये S.M.C. लुधियाना (पंजाब), मध्ये सुरुवात झाली. 1892 मध्ये महाराष्ट्रात मिरज मेडिकल स्कूल अँड हॉस्पिटल ची सुरुवात झाली.

सन 1867 दिल्ली येथे सेंट स्ट्रेबन हॉस्पिटल मध्ये भारतात प्रथमच महिलांसाठी परिचारिका प्रशिक्षण सुरुवात झाली. 1871 मद्रास येथील गव्हर्नमेंट जनरल हॉस्पिटलने पहिले नर्सिंग स्कूल सुरू केले त्यात चार विद्यार्थिनींचा प्रवेश घेतला होता. भारतात मिशन हॉस्पिटल ने संयुक्त प्रशिक्षण बोर्ड स्थापन करण्यात आले. त्याद्वारे परिचारिका प्रशिक्षणाचे मानदंड आणि नियम निर्माण करण्यात आले. भारतीय राज्यघटना अमलात आल्यानंतर विकासात्मक विविध योजना लागू करण्यात आल्या होत्या त्यामध्ये ध्येयधोरणे लागू करण्यात आले तसेच आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी काही समिता स्थापन करण्यात आल्या त्या समित्या आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या त्यांचा प्रभाव परिचारिका व्यवसायावर झाला. इसवी सन 1943 बोट समिती, सन 1954 सेट्टी समिती. सन 1961 मुदलियार समिती, 1973 कर्तारसिंह समिती, सन 1974 श्रीवास्तव समिती स्थापन

करण्यात आल्या होत्या शिवाय पंचवार्षिक योजनेतही आरोग्य विषयी तरतुदी करण्यात आल्या.

1.3 परिचारिका आरोग्य संकल्पना समाजशास्त्रीय दृष्टिकोन

मानवी आरोग्याचा अभ्यास समाजशास्त्रात नव्या पद्धतीने करण्यात आला आहे. आरोग्य समाजशास्त्र किंवा वैद्यकीय समाजशास्त्र ही नवीन ज्ञान शाखा आहे. मानवी आणि सामाजिक आरोग्याचे सखोल चिंतन करीत आहे. समाजशास्त्रज्ञांनी आरोग्य ही संकल्पना अधिक व्यापक अर्थाने उपयोगात आणली आहे त्यांच्या मते मानवी आरोग्य निरोगी राहणे किंवा बिघडणे हे आरोग्यावर आधारलेले आहे ते सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक घटकावर अवलंबून आहे त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात जसा मानवी आरोग्याचा अभ्यास केला जातो त्यापेक्षा वेगळ्या दृष्टिकोनातून मानवी आरोग्य समाजशास्त्रज्ञांनी समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे . आरोग्य हा शब्द इंग्रजीतील (HEALTH) शब्दाचे मराठी भाषांतर आहे. इंग्रजीतील (HEALTH) हा शब्द HAELTH अँग्लो सेक्शन शब्दापासून बनला आहे व ज्याचा अर्थ इंग्रजीतील कंडिशन ऑफ बिईंग सेफ OR साऊंड असा होतो. मराठीत या संकल्पनेचा अर्थ सुरक्षित व निरोगी स्थिती असा होतो तसेच दुसऱ्या शब्दात आपण असेही म्हणू शकतो रोगापासून मुक्त असणे किंवा कोणताही रोग नसणे म्हणजे आरोग्य होय.

1946 मध्ये न्यूयॉर्क येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय आरोग्य परिषदेत आरोग्य या संकल्पनेची व्याख्या करण्यात आली आहे ही डब्ल्यू. एच. ओ. आरोग्य संघटनेने आपल्या प्रस्ताविकेत प्रसिद्ध केले आहे. "आरोग्य म्हणजे परिपूर्ण शारीरिक,

मानसिक आणि सामाजिक उत्कृष्ट व्यवस्था होय, केवळ रोग किंवा दुर्बलतेचा अभाव म्हणजे आरोग्य असे म्हणता येणार नाही. व्यक्तीचे आरोग्य हे शारीरिक स्वास्थ्यावर आधारलेले आहे, व्यक्तीचे निरोगी राहणे त्यांच्या शारीरिक अस्तित्वासाठी अधिक महत्त्वाचे असते. स्त्री-पुरुष आणि इतर व्यक्तीचे आरोग्य हे त्यांच्या शारीरिक भेदामुळे भिन्न असू शकते. जेव्हा शारीरिक वेदना निर्माण होतात तेव्हा व्यक्तीचे आरोग्य बिघडते.”

आधुनिक काळात विज्ञानाने मानवी आरोग्यविषयी अनेक नवीन शोध लावले असल्याने बिघडलेल्या मानवी आरोग्यावर उपचार करणे शक्य झाले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने डॉक्टर, परिचारिका आणि तंत्रज्ञ अशा व्यक्तीची भूमिका महत्त्वाची आहे. त्यासाठी परिचारिका यांचे कार्य मानवी आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे

1.4 आरोग्याचे समाजशास्त्र -

संशोधन विषय हा वैद्यकीय समाजशास्त्रात अध्ययन क्षेत्रात असल्याने वैद्यकीय समाजशास्त्र ही एक नवीन ज्ञान शाखा आहे, या शाखेचे अध्ययन आजच्या आधुनिक आणि तांत्रिक विश्वात अत्यंत महत्त्वाचे ठरते. दुसऱ्या महायुद्धा नंतरच्या काळात वैद्यकीय समाजशास्त्राचा एक स्वतंत्र उपयोगी शास्त्र आणि समाजशास्त्राची एक शाखा म्हणून उदय झालेला आहे. 1945 ते 1950 या वर्षांमध्ये बऱ्याच समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश करून निरोगी- रोगी व डॉक्टर यांच्यातील मानवी सबंधाचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. बार्बर यांनी 1957 तर मार्टन यांनी 1965 च्या आसपास या नव्या शास्त्राची

भूमिका मांडली. सुमारे 25 समाजशास्त्रज्ञांना आरोग्य आणि वैद्यकीय व्यवसायामध्ये महत्त्वाचे पदे मिळाली आहेत.

रोग, उपचार, औषधे, स्वच्छता , आरोग्य इत्यादी क्षेत्रांमध्ये संशोधन झाले. संशोधन आणि प्रशिक्षण यामध्ये बऱ्याच संस्थानी आर्थिक सहाय्य दिले. रोग,आजार, सुश्रुषा यांचा वैद्यकीय व्यवसायातील व्यक्तीच्या सामाजिकरणाचा जवळचा संबंध आहे त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील घटना आणि मानवी सबंध यांचा समाजशास्त्रीय संशोधनाद्वारे अभ्यास केला जातो याचे महत्त्व पटेल यातूनच स्वतंत्र वैद्यकीय समाजशास्त्राचा उदय झाला.

आरोग्य समाजशास्त्राच्या व्याख्या पुढीलप्रमाणे विचारवंतांनी केलेल्या आहेत. वैद्यकीय समाजशास्त्र म्हणजे रोग त्यांची कारणे व त्यावरील उपाय शोधणारे शास्त्र वैद्यकीय समाजशास्त्राचा विशेष भर रोगाभोवतालच्या मानवी वर्तनावर असतो, रोगी-डॉक्टर यांच्यातील परस्पर संबंध रोग्याच्या कुटुंबियाची ताण- तणाव इत्यादी विषय सामाजिक संशोधनात निवडण्यात येतात. (डेव्हिड मेकॅनिक)

2. साहित्याचे सर्वेक्षण

पीएच.डी, एम. फिल, नियतकालिके, वर्तमानपत्रे, शासकीय दस्तावेज या सर्व घटकातून “नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन” या विषयावरील भूतकाळात आलेल्या संशोधनाचा संशोधन कार्यादरम्यान आढावा घेण्यात येईल. साहित्याचा आढावा खालील प्रमाणे घेण्यात येईल. सामाजिक संशोधनाची आणि अभ्यासाची व्याप्ती वाढली असल्याने विविध विषयावर संशोधने झालेली आहेत त्या अनुषंगाने

प्रकाशित आणि अप्रकाशित स्वरूपात साहित्य निर्माण झाले आहे, त्यामुळे संशोधन सुरू करण्यापूर्वी प्रथम संशोधन विषयाचा आढावा घेणे आवश्यक ठरते. संशोधन साहित्याचा आधार घेतल्याने संशोधन विषयाची पुनरावृत्ती टाळता येते, तसेच संशोधन विषयाच्या संदर्भात संशोधन अद्यावत होते व संशोधन विषयाची दिशा निश्चित करता येते, संशोधनाची पार्श्वभूमी कळते. संशोधन विषयाचे गृहितके मांडण्यास मदत होते. संशोधनाविषयी आराखडा व संशोधन पद्धती इत्यादी विषयी माहिती प्राप्त होते.

1) MOUDGIL AVINASH C. (1983) A STUDY OF NEED PROFILE AS RELATED TO JOB SATISFACTION AND ANXIETY LEVEL AMONGE NURSING PERSONNEL शोध प्रबंध पंजाब विद्यापीठ (चंदिगड) परिचारिकांच्या मानसिक अवस्था चे विश्लेषण केले आहे

2) उमादेवी माधव, पीएचडी नर्स अँड हेल्थ केअर सर्विसेस A SOCIOLOGCAL स्टडी कर्नाटक विद्यापीठात सादर केलेले आहे. या अभ्यासात परिचारिका कोणत्या घटकामुळे रोग्याच्या आरोग्याची काळजी घेतात याची अध्ययन केलेले आहे

3) राजर्षी विष्णू पांचाळ (2019) प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला परिचारिकांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ बीड.

4) विजया बाळकृष्ण, परिचारिकांच्या सामाजिक जीवनाचा समाजशास्त्रीय अभ्यास केला.

5) अभ्यंकर शशिकला

6) जोगळेकर कमल

7) पांचाली रॉय

8) दीप्ती शर्मा

भारतीय ग्रामीण परिवारो मे स्वास्थ परिचर्या का समाज वैज्ञानिक अध्ययन बहादुर सिंह विश्वविद्यालय जौ नपुर येथे पीएचडी साठी सादर केला आहे परिचारिकांचा अभ्यास करीत असताना भौ तातली असलेल्या वातावरणाचा अभ्यास केला आहे. इत्यादी संशोधक,लेखक, लेखिका यांनी परिचारिका या विषयावर प्रकाश टाकलेला आहे

3. संशोधन अध्ययनाचे उद्देश

मानवाला चांगले जीवन जगण्यासाठी चांगले आरोग्य असणे खूप महत्त्वाचे आहे म्हणूनच आरोग्यसेवा म्हटलं की परिचारिका आणि ति जे कार्य पार पाडते यास खूप महत्त्व आहे आरोग्याविषयी शिक्षण देणारी रुग्णाची सेवा करणारी म्हटलं की परिचारिका महत्त्वाची ठरते स्त्री ही जन्मापासूनच प्रेमळ निस्वार्थी सर्वांची सेवा करणारी असते व ती मातृत्वाची चांगल्या प्रमाणे भूमिका पार पाडते म्हणून त्यांनी केलेल्या सेवेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

परिचारिकांना रुग्ण आणि रुग्णाचे नातेवाईक डॉक्टर काही सहकारी यांच्यासोबत त्यांना काम करावे लागते अशा या सेवा करणाऱ्या परिचारिकेला समाज मात्र समजून घेत नाही हा व्यवसाय गरजेसाठी पैशासाठी करीत आहे असे मानले जाते त्यामुळे समाज त्यांच्याकडे तुच्छतेने पाहताना दिसून येतो परिचारिकाही स्वतःच्या तब्येतीकडे लक्ष देखील देत नाही ती समाजाची सेवा करताना दिसून येते ती सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांना माघे टाकून झटून सेवा करते पण समाजात हिच्या सेवेला स्थान नाही. परिचारिकेचा हा

व्यवसाय त्यांची गरज भागविण्यासाठी समजला जातो हे काम करीत असताना देखील आमच्या सेवेला मूल नाही असा तिच्या मनात न्यूनगंड आहे तो निघावा आणि समाज तिच्याकडे आरोग्याची सेवा करणारी आरोग्याचे शिक्षण देणारी आदर्श शिक्षिका म्हणून बघावे व तिला समाजात प्रतिष्ठा मिळावी या विचाराने नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्येचा समाजशास्त्रीय अभ्यास म्हणून निवडण्यात येणार आहे.

नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचा अभ्यास संशोधन करण्यासाठी पुढील रचना करण्यात आली आहे.

1) नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक ,आर्थिक आणि शैक्षणिक समस्या जाणून घेणे.
2) नांदेड शहरातील परिचारिकांना व्यवसायात येणाऱ्या विविध अडचणी जाणून घेणे.
3) नांदेड शहरातील रुग्णालयात परिचारिकांची स्थिती जाणून घेणे.
4) नांदेड शहरातील परिचारिकांची शैक्षणिक माहिती जाणून घेणे.
5) नांदेड शहरातील परिचारिकांची समाजातील स्थान जाणून घेणे.
6) नांदेड शहरातील अविवाहित परिचारिकांच्या विवाहात येणाऱ्या अडचणी जाणून घेणे.
7) नांदेड शहरातील काम करणाऱ्या रुग्णालयात काम करणाऱ्या परिचारिकांच्या प्रवासांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

8) नांदेड शहरातील विवाहित परिचारिकांच्या मुलांची जबाबदारी त्यांना घेता येते का जाणून घेणे.

4. गृहीतकृत्य

सामाजिक संशोधन गृहीतकर्त्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करावयाचा झाल्यास संशोधकाला त्या विषयाचे काहीतरी ठराविक अनुमान निश्चित करतो हे अनुमान पुढील अभ्यासात किंवा संशोधनात मार्गदर्शक ठरतात तेव्हा सर्वप्रथम गृहीतकृत्य म्हणजे काय हे पाहणे क्रमप्राप्त ठरते.

“गृहीतकृत्य अथवा उपकल्पना म्हणजे असे अनुमान की जे तथ्य निरीक्षणावर आधारलेले असून ज्यामुळे भावी संशोधन कार्याला चालना मिळते संशोधन कार्याला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात हे खरेच आहे.” (**गुडे आणि हेक्टर)**

वरील विवेचनावरून गृहीतकृत्य म्हणजे काय हे स्पष्ट झाले आहे. कोणत्याही सामाजिक संशोधनात ही गृहीतकृत्य दिशादर्शकाचे कार्य करीत असतात आणि संशोधनकर्त्यास अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचेही कार्य करीत असतात त्यामुळे समाजातील स्थितीचा आंतरबाह्य अंगांनी विचार करता येतो. थोडक्यात गृहीत कृत्य संशोधकाला दिशादर्शकाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात.

गृहीतकृत्यामुळेच सामाजिक संशोधनाला वैज्ञानिक प्रतिष्ठा प्राप्त होते म्हणून नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या अभ्यासासाठी पुढील गृहीतकृत्य ठरविण्यात आलेली आहेत. लुंडबर्ग यांच्या मते गृहीत कृत्य म्हणजे ज्या विधानाची सत्यता

पारखून घ्यावयाची आहे असे विधान अथवा सामान्यीकरण मूलता उपकल्पना हा एक काल्पनिक अथवा अनुमानात्मक विचार असू शकतो

1) परिचारिकांना समाजात ज्या प्रमाणात पाहिजे त्या प्रमाणात सामाजिक प्रतिष्ठा व वागणूक मिळत नाही.

2) परिचारिकांना वैद्यकीय सेवेत कार्य करीत असताना डॉक्टरांकडून योग्य तो सन्मान प्रतिष्ठा व वागणूक मिळत नाही.

3) परिचारिकांना अशासकीय रुग्णालयात कार्य करीत असताना योग्य प्रमाणात आर्थिक मोबदला मिळत नाही.

4) परिचारिकांना समाजात विविध आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

5) परिचारिकांना कार्य करीत असताना विविध शैक्षणिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

6) परिचारिकांना वेळेची कमतरता असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होते.

5. संशोधन आराखडा

कोणतेही संशोधन म्हटले की गुंतागुंतीची बाब ठरते पण योजनाबद्ध आराखडा करून कार्य केले तर आपण निवडलेल्या विषयाच्या मुळाशी जाऊ शकतो आराखडा निश्चित केल्यास संशोधन कार्यात सुसूत्रता आणि व्यवस्थितपणा येतो संशोधन आराखड्याबद्दल असेल लेख ऑफ यांनी म्हटले आहे की आराखडा म्हणजे विशिष्ट घटनेची अथवा समस्येची संबंधित निष्कर्ष प्रस्थापित करण्यासाठी तिचे संशोधन करण्यापूर्वीच संशोधन कार्यातील संभाव्य परिस्थितीच्या संदर्भात काही निर्णय बनविण्याची प्रक्रिया होय या व्याख्या त असेल लॅक ऑफ यांनी पूर्व

अभ्यासाला महत्त्व दिले आहे या वाक्य वरून आराखड्यामुळेच संशोधनाची दिशा निश्चित होते हे स्पष्ट होते.

पूर्व नियोजनाचा हा आराखडा तयार करताना शोध कार्याचा उद्देश लक्षात घेऊनच आराखडा निश्चित करावा लागतो एखादा स्थापत्यशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे इमारतीचा प्रथम आराखडा तयार करतो आणि त्यानंतर त्या आराखड्याप्रमाणेच वास्तू उभी करतो त्याप्रमाणे संशोधक कार्यात आराखड्याला महत्त्व आहे. संशोधन आराखडा निश्चित करताना पुढील बाबींचा विचार अत्यावश्यक ठरतो.

1) संशोधनाला सर्वप्रथम आपला अभ्यास विषय निश्चित करावा लागतो अभ्यासासाठी कोणती माहिती आवश्यक आहे हे ठरवावे लागते त्याचप्रमाणे अभ्यास विषयाचे कार्यक्षेत्र ठरवावे लागते त्याचप्रमाणे संशोधनस किती वेळ लागेल हेही ठरवावे लागते अशी नोंद आराखड्यात करावी लागते
2) निवडलेल्या विषयावर अभ्यास करण्याची आवश्यकता का वाटली म्हणजेच संशोधनाची गरज आणि संशोधनाचा उद्देश यांची नोंद संशोधकाला आराखड्यात करावी लागते
3) संशोधन प्रकल्प माहिती संकलित करण्यासाठी कोणत्या घटकांशी संपर्क साधणार हे नमूद करावे लागते
4) मिळालेल्या माहितीचे विश्लेषण कसे आणि कोणत्या पद्धतीने करणार याबाबतचे विवेचन आराखड्यातच करावे लागते.

सर्वप्रथम अभ्यासकांनी सांगितलेल्या संशोधन आराखड्याच्या प्रकारांबद्दल माहिती घेणे क्रमप्राप्त ठरते

नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयातील संशोधन प्रकल्पासाठी या ठिकाणी अन्वेषनात्मक व परिचयात्मक आणि वर्णनात्मक आराखडा वापरायचा आहे. संशोधनासाठी निश्चित केलेला विषय हा एक सामाजिक अभ्यास आहे समाजाचे प्रश्न हे सतत बदलत जाणारे आणि निवडलेला अभ्यास विषय हा नवीन असल्यामुळे आराखडा या ठिकाणी अधिक उपयुक्त ठरणारा आहे.

5.1 आराखड्याच्या प्रकार

संशोधन आराखडा म्हणजे संशोधन कशा पद्धतीने केले जाईल या सबंधात आराखडा तयार केला जातो आराखडा बनविणे म्हणजेच कार्य योजना आखणे होईल नियोजित कार्यात उपस्थित होण्याची शक्यता असणाऱ्या समस्या व अडचणींचा विचारपूर्वक अंदाज घेऊन त्या समस्या आणि अडचणींच्या निराकरणाची आगाऊ व्यवस्था करून घेण्याच्या प्रक्रियेला संशोधन आराखडा असे म्हटले जाते नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयासाठी अन्वेषणात्मक आराखडा वापरण्यात येत असून त्याप्रमाणे अनुभव सर्वेक्षण वापरण्यात येत असून तसेच वर्णनात्मक आराखडा वापरण्यात येणार आहे व या अभ्यास विषयासाठी हे उपयुक्त ठरेल.

5.1.1 अनुवेशनात्मक आराखडा

नांदेड शहरातील परिचारिकांचे सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी परिचारिकांच्या कार्याची वास्तविक माहिती जाणून घेण्यासाठी व संबंधित विषयाचा अभ्यास करणे महत्त्वाचे

ठरेल परिचारिकाही समाजात राहत असल्यामुळे तिला येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे तसेच या विषया संबंधित अज्ञात माहिती मिळवण्यासाठी तसेच ज्ञानाची वृद्धी वाढविण्यासाठी हा आराखडा नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी हा आराखडा महत्त्वाचा ठरेल

5.1.2. अनुभव सर्वेक्षण

ज्या व्यक्तींना विषय संबंधित अनुभव आहे अशा व्यक्तीकडून माहिती मिळवणे म्हणजे अनुभव सर्वेक्षण होय अनुभव सर्वेक्षणाची व्याख्या प्रा रा ना घोटाळे यांनी पुढील प्रमाणे केली संशोधक जे विषय क्षेत्र निवडतो त्याबाबतीत इतरांना काय माहिती आहे कोणते अनुभव आहेत हे संशोधकाने जाणून घेतले पाहिजे अशा अनुभव व्यक्तीशी संपर्क ठेवला पाहिजे अशा व्यक्तीचे अनुभव मार्गदर्शक ठरते

नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयांचा अभ्यास करण्यासाठी अनुभव सर्वेक्षण वापरण्यात येईल नांदेड शहरातील परिचारिकांची संपर्क साधून त्यांच्याकडून माहिती मिळवण्यात येईल व अनुभवी व्यक्तीकडून अभ्यास विषयाशी संबंधित ज्ञान मिळवण्यात येईल या विषयाशी तज्ञ असलेल्या सर्व व्यक्तीशी संपर्क साधण्यात येईल म्हणून नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी अनुभव सर्वेक्षण उपयुक्त ठरेल

5.1.3 वर्णनात्मक आराखडा

एखादी व्यक्ती समूह समाज घटना किंवा काही विषय असो किंवा समस्या असो त्या संबंधित वास्तविक तथ्यांचे वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन करणे म्हणजे वर्णनात्मक आराखडा होय

नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग करण्यात येईल पुढील बाबी प्रमाणे.

1. नांदेड शहरातील शासकीय व अशासकीय रुग्णालयात काम करणाऱ्या परिचारिकांच्या कार्यांचे वर्णन करणे महत्त्वाचे ठरेल.
2. नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे वर्णन करण्यात येईल.
3. नांदेड शहरातील परिचारिकांच्या व्यवसायाचे वर्णन करण्यात येईल.
4. नांदेड शहरातील परिचारिकांना रुग्णालयात असणाऱ्या सुविधा व सुविधांचे वर्णन करण्यात येईल.
5. नांदेड शहरातील रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांमुळे परिचारिकेस स्थान निर्माण होतो का याचे वर्णन करण्यात येईल इत्यादीचा अभ्यास करणे नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग करण्यात येईल.

5.2 संशोधनाचे क्षेत्र

नांदेड शहरामध्ये अंदाजे 350 ते 400 अशासकीय रुग्णालय आहेत त्याचबरोबर 15 ते 20 शासकीय रुग्णालय आहेत साधारणतः या सर्व रुग्णालयात मिळून अंदाजे तीन हजार परिचारिका नांदेड शहरात कार्यरत आहेत या परिचारिकांचे मुख्य तः 2 भागात विभागणी होते

1. शासकीय परिचारिका
2. अशासकीय परिचारिका

वरील परिचारिकांचे वेतन आणि त्यांना मिळणाऱ्या सुविधा या वेगवेगळ्या आहेत त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती ही वेगवेगळी आहे वरील परिचारिकांची सामाजिक आर्थिक शैक्षणिक समाजशास्त्रीय अध्ययन केले जाणार आहे या अध्ययनासाठी अंदाजे 300 परिचारिकांची निवड करण्यात येईल. नांदेडमध्ये विविध प्रकारचे रुग्णालय आहेत त्यात काही रुग्णालय 24 तास सेवा देणारे आहेत तर काही रुग्णालय केवळ दहा ते बारा तास सेवा देणारे आहेत. या विविध रुग्णालयाच्या प्रकारावरून तेथे काम करणाऱ्या परिचारिकांचे कामाचे स्वरूप बदलत जाते. नांदेड शहरातील परिचारिकारांचा विचार करत असताना त्यात मुख्यतः दोन्ही परिचारिकांचा संशोधनात अभ्यास केला जाईल

परिचारिकांचे कर्तव्य

1. रुग्णांची निस्वार्थ सेवा करणे
2. वेळेवर औषधी देणे
3. रुग्णांची सृशुषा करणे

5.2.1 नमुना पद्धत

संशोधनात नमुन्याला फार महत्त्व आहे संशोधनात नमुन्यावरून वस्तू विषयीचा अनुमान किंवा अंदाज काढला जातो याचा अर्थ समाष्टी किंवा समग्रातून निवडलेल्या एककांच्या म्हणजेच नमुनेच्या पाहणीवरून समाष्टी बाबत सामान्य स्वरूपाचे निष्कर्ष काढता येतात संशोधनात नेहमीच नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जातो विविध क्षेत्रांमध्ये संशोधन करीत असताना एका ज्ञानाबरोबरच संशोधन नमुना निवड पद्धतीचे ही ज्ञान असणे अत्यंत महत्त्वाचे आहे उदाहरणार्थ जसे आपण बाजारात गेल्यानंतर गहू किंवा तांदूळ घ्यायला जातो तर दुकानदार आपणास पोत्यातील थोडे गहू काढून दाखवतो जे काढलेले गहू असतात त्यास नमुना म्हणतात व पोते हे जनसंख्या होईल तसेच नमुनेची पुढील प्रमाणे व्याख्या करता येते गुड आणि हॅट यांच्यामध्ये नमुना त्यांच्या नावाप्रमाणे एक व्यापक समूहाचा लहान प्रतिनिधी होय

बोगार्डस यांच्या मते नमुना निवड म्हणजे पूर्वनियोजित योजनेनुसार मोठ्या गटातून ठराविक टक्केवारी निवडणे होय नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयासाठी यादृच्छिक नमुना निवड वापरण्यात येईल.

5.2.4 यादृच्छिक नमुना निवड

परिचारिकांचे 2 गटात वर्गीकरण करण्यात येत असून शासकीय, अशासकीय परिचारिकांचा आपण विचार करणार आहोत. 300 परिचारिका यादृच्छिक पद्धतीने घेण्यात येतील यावरून मला असे वाटते की सर्व वरील परिचारिकांच्या घटकांचा

अभ्यास करताना समान न्याय मिळेल. स्तरित नमुना निवड नांदेड शहरातील परिचारिकांमध्ये कामाच्या स्वरूपावरून सुविधा आणि मोबदला यांच्या आधारावरून आपणास 2 समान गट करता येतात शासकीय परिचारिका, अशासकीय परिचारिका. नांदेड शहरातील शासकीय व शासकीय रुग्णालयाची संख्या अंदाजे 350 ते 400 असून परिचारिकेची संख्या अंदाजे 3 000 आहे, त्यापैकी 300 प्रतिनिधी या पद्धतीनुसार निवडण्यात येतील.

5.2 तथ्य संकलनाची साधने

कोणतेही संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी तथ्य संकलन करणे महत्त्वाचे आहे तथ्य संकलन म्हणजे आपल्या विषयासंबंधीत माहिती गोळा करणे म्हणजे तथ्य संकलन होय. तथ्य संकलनाच्या दोन पद्धती आहेत 1 प्राथमिक तथ्य 2 दुय्यम तथ्य.

प्राथमिक तथ्यात संशोधकाला त्या क्षेत्रात जाऊन विषय संबंधित माहिती गोळा करावी लागते. दुय्यम तथ्यात मात्र आपल्या विषयाशी संबंधित सचरित्रे दैनंदिनी वर्तमानपत्रे पुस्तके साप्ताहिके मासिके प्रबंध लिखित साहित्य इत्यादी दुय्यम तथ्यातून माहिती गोळा करावी लागते. नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक तथ्य व जेथे आवश्यक असेल तेथे दुय्यम तथ्य वापरण्यात येतील.

5.3.1 निरीक्षण

नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी परिचारिका ज्या क्षेत्रात काम करते ते रुग्णालय शासकीय किंवा अशासकीय असल्यास परिचारिकांचे कार्य काय आहे यासाठी निरीक्षण पद्धतीचा वापर करण्यात येईल

अनुसूची पद्धती वापरण्यात येईल

नांदेड शहरातील परिचारिकांचे सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी अनुसूची पद्धतीचा उपयोग करण्यात येईल या विषयाशी संबंधित प्रश्न परिचारिकेंना विचारून स्वतः माहिती भरून घेण्यात येईल कारण परिचारिका कामाच्या काही मुळे किंवा त्यांना असणाऱ्या ताणतणावामुळे प्रश्नाची उत्तरे चुकण्याची शक्यता असते म्हणून प्रत्यक्ष प्रश्न विचारून उत्तरे स्वतः लिहून घेण्यात येतील म्हणून नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यासाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरेल

मुलाखत अनुसूची वापरण्यात येईल.

शहरातील परिचारिकांचे सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी मुलाखत अनुसूची चा वापर करण्यात येईल प्रत्यक्ष परिचारिकेंना भेटून संबंधित विषयाशी प्रश्नांची उत्तरे स्वतः भरून घेतली जाते व माहिती व्यवस्थित भरून घेण्यात येईल म्हणून मुलाखत अनुसूची ही पद्धत नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक

आणि शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करण्यासाठी अधिक उपयुक्त ठरेल तसेच संबंधित विषयाचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम तथ्याचा देखील जेथे आवश्यकता पडेल तेथे विषयाशी संबंधित पुस्तके वर्तमानपत्रे मासिके प्रबंध इत्यादींचा वापर करण्यात येईल

5.4 तथ्य विश्लेषण प्रक्रिया

संशोधन करीत असताना हे महत्त्वाचे आहे त्याचे विषयांची व्याख्या ने केलेली आहे व्याख्या मुलाखत प्रश्नावली अनुसूची इत्यादीच्या लिखित किंवा मौखिक साधना द्वारे संकलित केलेल्या तथ्यांचा पद्धतशीर वस्तुनिष्ठ व प्रमाणबद्ध अर्थविश्व करण्याच्या संशोधनाचा तंत्राला तथ्य विश्लेषण म्हणतात. नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या विषयाचा अभ्यास करीत असताना गुणात्मक संशोधन पद्धती त्यामध्ये प्रश्नावली शेकडेवारी नंबर दोन मुलाखत प्रश्नावली असे विश्लेषण पद्धती आणि नंबर तीन निरीक्षण सूची में मध्यमान संख्यात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल

1. अनुसूची
2. मुलाखत अनुसूची
3. निरीक्षण सूची

6. संशोधनाचे महत्व

नांदेड शहरातील परिचारिका कर्मचाऱ्यांना जाणवणाऱ्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सदरील संशोधनाचे वेगळे महत्व

असलेले दिसून येते त्याचे कारण की नांदेड शहरातील परिचारिकांची सामाजिक स्थिती ही जशी पाहिजे त्या प्रमाणात असलेली दिसून येत नाही त्याचबरोबर त्यांना वेगवेगळ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो आणि तो करत असताना त्यांना त्यांच्या शिक्षणाकडे पण दुर्लक्ष करावे लागते.

नांदेड शहरातील परिचारिकांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी सदरील संशोधन हे अत्यंत महत्त्वाचे आणि उपयुक्त असलेले दिसून येते तर त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासन, आरोग्य अधिकारी आणि वैद्यकिय अधिकारी यांनी त्यांचा कामानुसार योग्य तो पगार द्यावा. तर शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी त्यांना कुठुंबाचा पाठिंबा असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नांदेड शहराबरोबरच सर्वच ठिकाणच्या परिचारिकांनी स्थिती सुधारण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे. अशा प्रकारे आपणास त्यांचे महत्त्व असलेले दिसून येते.

7. संशोधनाच्या मर्यादा

नांदेड शहरातील परिचारिकांच्या सामाजिक आर्थिक शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन हा अभ्यास विषय असून या अभ्यास विषयाच्या मर्यादा या परिचारिकांशी संबंधित पुढीलप्रमाणे सांगण्यात येतील.

1. सदरील संशोधन हे नांदेड शहरापुरतेच मर्यादित राहील.
2. नांदेड शहरातील शासकीय व अशासकीय रुग्णालय पुरतेच मर्यादित राहील.
3. सदरील संशोधन हे आरोग्य विभागापुरतेच मर्यादित राहील.
4. सदरील संशोधन हे महिलां परिचारिका पुरते मर्यादित राहील.

8. **संदर्भसूची**.

1) पाटील अरुंधती (2012 अरुणा प्रकाशन लातूर) परिचारिकांच्या संकल्पना
2) काळदाते सुधा आणि गायकवाड शंकर, श्री लक्ष्मी प्रकाशन, वैद्यकीय समाजशास्त्र
3) पि. के कुलकर्णी (2008) डायमंड प्रकाशन पुणे, आरोग्य आणि समाजशास्त्र
4) डॉ प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर सामाजिक संशोधन पद्धती
5) डॉ. डी. सी. सावंत, डॉ. रवी. एन. सरोदे,(2021) ईगल लीप प्रकाशन पुणे संशोधन पद्धती
6) गुरुनाथ नाडगोंडे (फडके प्रकाशन कोल्हापूर) सामाजिक संशोधन पद्धती
7) शोधगंगा, युट्युब, गुगल

संशोधक,	मार्गदर्शक,
सविता प्रकाश लव्हाळे	प्रा. डॉ. सुरेश व्ही. धनवडे